# एकपात्री सादरीकरण अवघड गोष्ट

## ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचे प्रतिपादन



**एकपात्रींचा कॉमेडी मेकर्स या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलताना ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे. याप्रसंगी विजय कोटस्थाने, चौताली माजगांवकर-भंडारी, श्रीप्रकाश सप्रे.**

**पुणे : प्रतिनिधी**

एकापेक्षा अधिक कलाकारांनी एकत्र येऊन रसिकांना खिळवून ठेवणे सोपे आहे. मात्र, एकाच कलाकाराने अनेक रसिकांना खिळवून ठेवण्याचे काम खूप अवघड आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांनी केले.

पुणे शहर एकपात्री कलाकार परिषदेच्या वतीने सोमवारी एकपात्रींचा कॉमेडी मेकर्स कार्यक्रम सादर करून भालचंद्र पेंढारकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन सुहासिनी देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी परिषदेच्या अध्यक्षा चौताली माजगांवकर-भंडारी, उपाध्यक्ष विजय कोटस्थाने, श्रीप्रकाश सप्रे, दिलीप हल्ल्याळ आदी उपस्थित होते. देशपांडे म्हणाल्या, आम्ही अभिनय केला. मात्र, एकपात्री कला जमली नाही. आताची पिढी भाग्यवान आहे. त्यांना विविध सेवासुविधा असल्यामुळे काम सोपे झाले आहे.

या वेळी पुण्यातील कलाकारांनी एकपात्री प्रयोग सादर करून पेंढारकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. यात विजय कोटस्थाने-पुणे दूरदर्शन, अंजली शहा-ह्युमन गॅरेज, चौताली माजगांवकर भंडारी -गंमत जंमत, श्रीप्रकाश सप्रे-सप्रेम नमस्कार, विश्वास पटवर्धन-स्वभाव राशींचे, कल्पना देशपांडे-अस्सा नवरा, दिलीप हल्ल्याळ आणि मृदुला मोघे-हास्य षटकार आदींचा समावेश होता.